# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या २०० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि. २४ जून, २०२५ रोजी सकाळी ११: ३० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०० वी बैठक **मंगळवार, दि.२४ जून, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ.अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांनी आपली अनुपस्थिती ईमेलद्वारे कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १. दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.१० जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९९ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. २२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | विद्यार्थी विकास विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | विद्यार्थी त्याचा एक कमावता पालक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी ई निविदा प्रक्रीया राबवून विमा कंपनी ठरविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | विद्यार्थी त्याचा एक कमावता पालक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" लागू करणेबाबत दि.०९ जून, २०२५ च्या पत्रानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | २. दि.१० जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | उपस्थितीपत्रकातील पूर्वीचा अनुक्रमांक १७ | |
| | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | |
| | उपस्थितीपत्रकातील दुरुस्त केलेला अनुक्रमांक १७ | |
| | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | |
| | विषय क्र. ०३ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | सन २०२५-२६ या वर्षात दक्षिण पश्चिम विभागीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यासाठीचा प्रस्ताव असोसिएशन ऑफ इंडीयन युनिव्हर्सीटी न्यू दिल्ली यांना देण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी रुपये एक कोटी दहा लाख इतक्या खर्चाची तरतूद करण्यास बहुमताने मान्यता देण्यात आली. तसेच प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व श्री. सुधाकर तुकाराम सरवदे, व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी भिन्न (Dissent) मताची नोंद घेण्याबाबत मागणी केली त्यामुळे प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व श्री. सुधाकर तुकाराम सरवदे, व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या भिन्न (Dissent) मताची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. सौ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक (Academic Level १२ to १३A) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. सौ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक यांचे सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक (Academic Level १२ to १३A) या पदावर कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता प्राप्त प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या छाननी समितीकडून पडताळणी होऊन छाननी समितीचा अहवाल आस्थापना विभागास प्राप्त झाला असून, सदर अहवालानुसार त्या पदोन्नतीसाठी पात्र आहेत.<br>सदर कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार निवड समिती गठित करावी लागणार आहे. त्याकरिता निवड समितीमधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे.)<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. सौ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक (Academic Level १२ to १३A) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक) |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. सौ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक (Academic Level १२ to १३A) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level १४ to १५) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल यांचे प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level १४ to १५) या पदावर कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता प्राप्त प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या छाननी समितीकडून पडताळणी होऊन छाननी समितीचा अहवाल आस्थापना विभागास प्राप्त झाला असून, सदर अहवालानुसार ते पदोन्नतीसाठी पात्र आहेत.<br>सदर कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार निवड समिती गठित करावी लागणार आहे. त्याकरिता निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे.)<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level १४ to १५) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक) |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level १४ to १५) या पदावर पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी रुजू होणार नसल्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध पायाभूत सुविधा निर्मिती व विकासाच्या दृष्टीकोनातून विविध प्रकल्पाची सुरुवात झाली आहे. विद्यापीठाचे नविन प्रशासकीय इमारतीचे व खेलो इंडिया प्रकल्पाचे बांधकाम पुर्णत्वास येत आहे. तसेच विद्यापीठामध्ये पायाभूत सुविधा व शिक्षण आणि संशोधन विकासाकरिता पी.एम. उषा अंतर्गत निधी प्राप्त झाला आहे. विविध अध्यासन केंद्र, दिव्यांग विद्यार्थ्याकरिता शिक्षण सुविधा केंद्र, तृतीय पंथीय विद्यार्थ्याकरिता शिक्षण सुविधा केंद्र अशा विविध प्रस्तावांचा पाठपुरावा करुन शासनाकडून भरघोस निधी प्राप्त करुन घेण्यासाठी व त्या कामाकरिता सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. या विविध प्रस्तावाचा पाठपुरावा करुन शासनाकडून मान्यता व निधी मिळण्याकरिता तो विशेष कार्यासन अधिकारी हा महाराष्ट्र व केंद्र शासनाची संपर्कात राहून विविध शासकीय कार्यालय व आस्थापने शी संपर्क करुन विद्यापीठात हे प्रकल्प कसे येतील आणि त्याकरिता शासन भरघोस निधी कसा देईल यासाठी प्रयत्न करेल. एक प्रशासन कुशल, इंग्रजी मराठी हिंदी या भाषेवर प्रभुत्व असणारा, महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन यांच्याशी संपर्क करुन योग्य समन्वय साधणारा व विद्यापीठ विकासासाठी सदर प्रकल्पाची गरज आहे हे पटवून देणाऱ्या विशेष कार्यासन अधिकाऱ्याची गरज आहे.<br>त्याअनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी अध्यासन केंद्र यांनी दि. २७ जानेवारी, २०२५ च्या व्यवस्थापन परिषदे समोर विषय सादर केला असता, व्यवस्थापन परिषेदेने पुढीलप्रमाणे ठराव पारीत केला आहे. "विशेष कार्यासन अधिकारी ६ महिन्याकरिता घेण्यास व त्यांना प्रतिमाह रु. ४०,०००/- इतके मानधन विद्यापीठ फंडातून आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."<br>त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली आहे.<br>१. प्रा.डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा : अध्यक्ष<br>२. डॉ. अजित माधव पाटणकर : सदस्य<br>३. श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील : सदस्या<br>४. योगिनी घारे : सदस्य -सचिव<br>उक्त गठित समितीने दि.०२/०४/२०२५ रोजी विशेष कार्यासन अधिकारी या पदाकरिता पात्र उमेदवारांची मुलाखत घेतली. सदर मुलाखतीमधुन पात्र झालेल्या उमेदवाराचे नाव फर्मला कळविण्यात आले. त्याअनुषंगाने फर्मने दि.२२/०४/२०२५ पासून उमेदवार रुजू होणार असल्याचे कळविले होते. तद्नंतर दि.१४/०५/२०२५ रोजीच्या पत्रास अनुसरुन पात्र उमेदवार (श्रीमती अमृता अकलुजकर) या रुजू होणार नसल्याचे कळविले आहे.<br>सबब, कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी रुजू होणार नसल्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी रुजू होणार नसल्याची नोंद घेण्यात आली.**<br>**तसेच श्री. चंद्रकांत मारुती होळकर, सेवानिवृत्त सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी म्हणून ०६ महिन्याकरिता विद्यापीठ फंडातून नियुक्त करण्यास व त्यांना प्रतिमाह ₹३०,०००/- इतके मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सन २००४ मध्ये सोलापूर विद्यापीठ निर्मिती झाले नंतर प्रयोगशाळा परिचरची ०६ पदे व ग्रंथालय परिचरचे ०१ पदे शिवाजी विद्यापीठातून वर्ग करण्यात आली. त्यानंतर दि.१९/०९/२००९ च्या आकृतीबंधानुसार ०६ पदे प्रयोगशाळा परिचर व ०२ पदे ग्रंथालय परिचर पदास मान्यता मिळाली. सदरची दोन्ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरणे आवश्यक होते. तथापि, दि.२५/०४/२००८ च्या संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी पदोन्नतीचे पदे सरळसेवेने मान्यता दिली. कारण तत्कालीन परिस्थितीमध्ये पदोन्नोती करीता कर्मचारी वर्ग उपलब्ध नव्हता.<br>परंतू सन २०१०, २०१२ व २०१६ च्या सरळसेवेच्या भरतीमुळे पदोन्नत्ती करिता कर्मचारी उपलब्ध आहेत. तसेच प्रयोगशाळा परिचरची ०६ पदे व ग्रंथालय परिचरचे ०१ पद रिक्त आहेत व त्यासाठी वर्ग ४ मधील सेवक वर्ग ही उपलब्ध आहे. त्यामुळे सदरची पदे पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.<br>दि.२२ जुलै २००४ च्या महाराष्ट्र शासन राज पत्रानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केलेले परिनियम, अध्यादेश विनियम आणि नियम यांचे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून उक्त अधिनियमाखालील आधिकारांचे वापर करुन अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत ते अमलात आणणे चालू राहिल. त्यामुळे प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर यांच्या रिक्त झालेला पदाच्या नियुक्तीबाबत शिवाजी विद्यापीठास विचारणा केली असता त्यांनी दि.०८ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार त्याची कार्यप्रणाली नमुद करुन कळविलेले आहे.<br>सदर पत्रात त्यांनी उच्च शिक्षण सेवायोजना विभागाच्या दि.२९/०१/१९९० च्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच शासन निर्णय क्र.१६९०/(१५७३)विशि-४ दि.०४/११/१९९२ च्या शासन निर्णयातील तरतुदी व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय मदतनीस/ परिचर ही पदे वर्ग-४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरण्यात आली आहे असे कळविले आहे. त्याचप्रमाणे वर्ग -४ मधील जे सेवक उपरोक्त पदासाठी इच्छूक आहेत. त्यांची सेवाजेष्ठता यादी तयार करुन पदोन्नतीची प्रक्रीया राबविण्यात येते असेही त्यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेले आहे.<br>सबब, शिवाजी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचरची रिक्त पदे पदोन्नतीने वर्ग करुन वर्ग ४ सेवकातून पदोन्नतीने भरण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **श्री. धाकडे विजयकुमार माधवराव, वरिष्ठ लिपिक, जैवविज्ञान संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांचे दि.२७/०३/२०२५ रोजीचे उपचाराकरीता अग्रीम मिळणेबाबतचे विनंती पत्र विचारार्थ.**<br>टिपणी: उपरोक्त पत्रान्वये श्री. धाकडे विजयकुमार माधवराव, वरिष्ठ लिपिक, प्रस्तुत विद्यापीठ यांनी त्यांचे लिव्हरचा आजार व कावीळ झाल्याने वेळप्रसंगी शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे, व सदर प्रक्रीया दिर्घकाळ असल्याने अंदाजे रु. ४,००,०००/- (चार लाख रु.फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याचे, सादर खर्चासंदर्भातील प्रमाणपत्र केलेले आहे. तसेच सद्य:स्थितीत त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांना त्यांच्या उपचाराकरिता तातडीची गरज म्हणून विद्यापीठ फंडातून रु.४,००,०००/-(अक्षरी चार लाख रु.फक्त) अग्रीम (Advance) स्वरुपात मिळणेबाबत, तसेच सदरची रक्कम त्यांच्या पगारातून हप्त्याने कपात करुन घेणेबाबत त्यांनी उपरोक्त अर्जान्वये विनंती केली आहे.<br>सदर प्रकरणावर डॉ. अभिजित जगताप, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ यांचा पुढीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झाला आहे. १) अर्जदार श्री. धाकडे विजयकुमार हे या वैद्यकीय कारणास्तव दि.१३/०३/२०२५ ते दि.२२/०३/२०२५ या कालावधीत अश्विनी रुग्णालय, सोलापूर येथे उपचाराधीन होते. सदर अर्जदार हे विद्यापीठ कर्मचारी ग्रुप मेडिक्लेम योजनेचे सदस्य असून त्यांना सदर योजनेमधून संदर्भ ४ नुसार रु.२५,८१३/- इतक्या रकमेचा खर्च मंजूर झालेला आहे. सदर योजनेननुसार प्रत्येक कर्मचाऱ्यास रु.५ लाख इतक्या रकमेपर्यंत वैद्यकीय खर्चाचे लिमिट असल्याने त्यांना यापुढील काळात यदा कदाचित वैद्यकीय उपचार घ्यायचे झाल्यास त्याकरीता संबंधित विमा कंपनीकडे क्लेम करता येऊ शकतो. २) अर्जदार यांचे अश्विनी रुग्नालयातील उपचार फिजिशियन डॉ. निर्मल तापडिया यांचे कडे चालू असल्याचे कागदपत्रांद्वारे दिसून येते. तथापि, अर्जदार यांनी पुढील काळातील खर्चा करीता संदर्भ क्र.३ नुसार डॉ. आर.आर. तापडिया यांचे प्रमाणपत्र दिलेले आहे. डॉ.आर.आर. तापडिया हे एम.बी.बी.एस. डॉक्टर आहेत तसेच त्यांनी दिलेल्या खर्चाच्या प्रमाणपत्रामध्ये केवळ रु.४ लाख रकमेचा उल्लेख केला असून त्याचा तपशील आढळून आलेला नाही. | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | यापूर्वी प्रस्तुत विद्यापीठातील खालील कर्मचाऱ्यांना विद्यापीठ फंडातून रक्कम देण्यात आली असून ती त्यांच्या वेतनातून दरमहा समान हप्यात कपात करुन घेण्यात आलेली आहे.<br>१) श्री. सावळगी राजेश जवाहर, जमादार यांना रु.१,५०,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>२) श्री. जाधव अनिल बाबुराव, सहायक कुलसचिव यांना रु.१,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>३) श्रीमती बागवान निलोफर इकबाल, कनिष्ठ लिपिक यांना रु.१,५०,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>४) श्री. विवेक जयसिंग कदम, वरिष्ठ लिपिक यांना रु.१,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>५) श्रीमती अनभुले सुप्रिया विवेकानंद, कनिष्ठ लिपिक यांना ही रु.१,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>६) श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक यांना व्यवस्थापन परिषदेच्या दि.०६/०२/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या ठराव क्र.७ "श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक यांची वैद्यकीय तातडी विचारात घेता, त्यांच्याकडून रक्कम परतावाबाबत हमी पत्र घेवून अग्रीम रु.५ लक्ष विशेष बाब म्हणून अदा करण्यास व त्यापोटी रु.५०००/- (अक्षरी - रुपये पाच हजार फक्त) दरमहा वेतनातून पूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत कपात करण्यास तसेच वैद्यकीय प्रतीपूर्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्यामधून शिल्लक अग्रीम रक्कम समायोजित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली" यानुसार रु.५,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>सबब, श्री. धाकडे विजयकुमार भाधवराव, वरिष्ठ लिपिक, जैवविज्ञान संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांचे दि.२७/०३/२०२५ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ. | |
| ठराव: | **श्री. धाकडे विजयकुमार भाधवराव, वरिष्ठ लिपिक, जैवविज्ञान संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांच्या दि.२७/०३/२०२५ रोजीच्या पत्रानुसार त्यांना उपचाराकरीता अग्रीम ₹१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार) विद्यापीठ फंडातून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०७ ]</td><td>दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: दि.२३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या महात्मा बसवेश्वर तज्ञ सल्लागार मंडळाच्या बैठकीतील विषय क्रमांक ०३ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>“पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत.”<br>त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br><table><tr><td>ठराव</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे कार्य गतिमान व सुनियोजित करणेसाठी मनुष्यबळ कमरता असल्याने असल्याने या अध्यासना अंतर्गत "प्रकल्प सहाय्यक" हे पद निर्माण करुन या पदाकरिता P.G. (पदवीधारक / पदव्युत्तर) पीएच.डी. संशोधन/ पोस्ट डॉक्टरेट पदवीसाठी कार्य करीत असलेला एक कुशल विद्यार्थी / विद्यार्थीनी नियुक्त करण्याचे ठरले. याकरिता UGC/ICSSR च्या नियमावलीचे पालन करुन सदर व्यक्तीस किमान रु. २०,०००/- (वीस हजार रुपये फक्त) इतके मानधन देण्याचे ठरले.</td></tr></table>उपरोक्त ठरावानुसार सदरचा विषय दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये सादर केला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.<br><table><tr><td>ठराव</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.</td></tr></table>सबब, दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या महात्मा बसवेश्वर तज्ञ सल्लागार मंडळाच्या बैठकीतील विषय क्रमांक ११ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राला अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत.<br>त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>ठराव: महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे कार्य गतिमान व सुनियोजित करणेसाठी मनुष्यबळ कमतरता असल्याने या अध्यासना अंतर्गत "प्रकल्प सहायक" हे पद निर्माण करुन या पदाकरिता P.G. (पदवीधारक/पदव्युत्तर) पीएच.डी. संशोधक/पोस्ट डॉक्टरेट पदवीसाठी कार्य करीत असलेला एक कुशल विद्यार्थी/ विद्यार्थीनी नियुक्त करण्याचे ठरले. या करिता UGC/ICSSR च्या नियमावलीचे पालन करुन सदर व्यक्तीस किमान रु.२०,०००/- इतके मानधन देण्याचे ठरले.<br>उपरोक्त ठरावानुसार सदरचा विषय दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये सादर केला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.<br>ठराव: प्रस्तुत विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत महात्मा बसवेश्वर तज्ञ सल्लागार मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र |
| ठराव: | **दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीमध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राला आवश्यक मनुष्यबळ मिळणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब क्र. १३ मध्ये तरतूद केलेल्या रक्कमेत सुधारणा करण्यासंदर्भातील विषय विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आपत्कालीन निधी पोटी जमा झालेल्या निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासंदर्भात प्रस्तुत विभागाने संदर्भ १ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेकडून Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund साठी मान्यता घेतली होती. सदर Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब अ.क्र. १३ नुसार विद्यापीठासाठी रुग्णवाहिका घेण्यासाठी रु.८,००,००० इतकी रक्कम तरतूद मंजूर करण्यात आलेली होती. सदरचा विषय नोव्हेंबर २०१८ मधील झालेल्या बैठकीत मंजूर झालेला होता मात्र दरम्यानच्या काळात काही कारणास्तव सदर निधी खर्ची पडलेला नाही.<br>संदर्भ २ नुसार सद्यस्थितीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आपत्कालीन निधी पोटी जमा झालेल्या निधीवरील व्याजाची रक्कम रु.२५,५८,८१७/- इतकी असून ती अद्याप खर्ची पडलेली नाही. सदर अखर्चित निधीमधून विद्यापीठ आरोग्य केंद्रासाठी Basic Life Support रुग्णवाहिका खरेदी करण्यासंदर्भात मा. कुलगुरू महोदय यांनी सूचना केलेली आहे.<br>संदर्भ ३ नुसार सद्यस्थिती मध्ये Basic Life Support स्वरुपाची रुग्णवाहिकेच्या किमती किमान रु.१४ लाख ते २० लाख पर्यंत असून २०१८ साली रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी केलेली रु.८,००,०००/- लाखाची तरतूद अपुरी पडणार आहे. त्या अनुषंगाने सदर तरतूद वाढवून रु.२०,००,०००/- लाख इतकी करण्याची आवश्यकता आहे. सदरचा निधी व त्याचे विनियोजन करण्याची बाब पुन्हा एकदा विचारार्थ. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय पुढील बैठकीत पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **कौशल्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व परीवर्तन समुह बहुउद्देशीय संस्था यांच्याशी सामजस्य कराराचा मसुदा विचारार्थ.**<br>टिपणी: कौशल्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व परीवर्तन समुह बहुउद्देशीय संस्था यांच्याशी सामंजस्य करार झाल्यास कराराचा विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या सर्व संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांकरिता फायदा होईल. यास्तव, कौशल्य विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व परीवर्तन समुह बहुउद्देशीय संस्था यांच्याशी होणाऱ्या कराराचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे. तरी मान्य करण्याची बाब विचारार्थ. | पदवी अभ्यासक्रम प्रवेश विभाग |
| ठराव: | **कौशल्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व परीवर्तन समुह बहुउद्देशीय संस्था यांच्याशी करावयाच्या सामंजस्य कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **प्रस्तुत विद्यापीठ स्थापनेपासून शिक्षकांच्या बदलीनंतर व पदोन्नत्तीनंतर सादर करण्यात येणाऱ्या चेजेस इन स्टाफ चे प्रस्ताव दाखल करताना रु.५०/- इतकेच शुल्क घेण्यात येत असून सदरचे शुल्क वाढविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: संलग्नित महाविद्यालयातील विद्यापीठ विहित निवड समिती मार्फत अथवा स्थानिक निवड समिती मार्फत नियुक्त झालेले व शिक्षकांच्या हुद्यातील बदल तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात बदली या करिता शिक्षकांना चेंजेस-इन-स्टाफ मान्यता घेणे आवश्यक आहे. शिक्षकांना विद्यापीठ मान्यता मिळाल्यानंतर सदर मान्येतेकरिता चेंजेस-इन-स्टाफ अर्ज विभागात सादर केला जातो. सदर चेजेस इन स्टाफ ची अर्जाचे तथा प्रक्रियेचे दोन्हीची रक्कम प्रस्तुत विद्यापीठात फक्त ५०/- रुपयेच आकारण्यात येते. सदरची रक्कम प्रस्तुत विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून रु. ५०/- इतकीच आहे. चेजेस इन स्टाफ चे प्रस्ताव तपासणीकरीता दर तीन महिन्यात दोन ते तीन वेळा बैठकांचे आयोजन करण्यात येते. प्रत्येक बैठकीला अंदाजे ५५ ते ६० प्रस्ताव तपासणी साठी येतात. प्रस्तावांची संख्या ५५ ते ६० असल्यामुळे प्रस्ताव तपासणीचे काम एका दिवसात पूर्ण होत नाही. प्रस्ताव तपासणी करीता दोन ते तीन वेळा बैठकीचे आयोजन करावे लागते.<br>सदर तपासणी साठी ५ सदस्यांची समिती गठीत आहे. प्रत्येक सदस्यांचे T.A. / D.A. प्रवास जर कार ने केला असेल तर कारचे पेट्रोलचा झालेला खर्च इ. विद्यापीठ खर्चातूनच केले जाते. सदर प्रत्येक बैठक ही दिवसभर असल्यामुळे समिती सदस्यांना चहा नाष्टा यांची सोय करण्यासाठी देखील खर्च येतो. पुनःश्च बोलविण्यात आलेल्या बैठकीस ही वरील प्रमाणेच सर्व खर्च हे करावे लागतात. तसेच सर्व प्रक्रियेसाठी प्रशासकीय कर्मचारी / अधिकारी शिपाई देखील कार्यरत असतात.<br>वरील बाबी विचारात घेता प्रस्तावांचे जमा होणारे अंदाजे शुल्क रु. ३,०००/- इतके होते. आणि साधारणत: एका बैठकीस जवळपास रु.८०००/- ते रु.१०,०००/- इतका खर्च येत आहे. शिवाजी विद्यापीठात देखील शै. वर्ष २०१८ मध्ये शिवाजी विद्यापीठाकडून चेजेस इन स्टाफ च्या अर्जाचे शुल्क रु.१,०००/- हे करण्यात आले आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ स्थापनेपासून शिक्षकांच्या बदलीनंतर व पदोन्नत्तीनंतर सादर करण्यात येणाऱ्या चेजेस इन स्टाफ चे प्रस्ताव दाखल करताना रु.५०/- इतकेच शुल्क घेण्यात येत असून सदरचे शुल्क वाढविण्याची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता १ विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ स्थापनेपासून शिक्षकांच्या बदलीनंतर व पदोन्नत्तीनंतर सादर करण्यात येणाऱ्या चेजेस इन स्टाफ चे प्रस्ताव दाखल करताना रु.५०/- वरुन वाढ करुन रु.१,०००/- इतके शुल्क घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **पीएच.डी. इतिहास विषयाकरिता प्रवेशित गायकवाड बाळू भिमराव या विद्यार्थाची पीएच.डी. शुल्क/दंडाची रक्कम माफ करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: १. जावक्र क्र. पुअहोसोविसो/एआरडी विभाग/पीएचडी/२०२४-२५/४४५० दि.२० जून, २०२४<br>२. जावक क्र.पुअहोसोविसो/एआरडी विभाग/पीएचडी/२०२४-२५/२०६० दि.२० मार्च, २०२५<br>३. दि.२०/०५/२०२५ रोजीची मा. कुलगुरु महोदयांची मान्य टिपणी.<br>इतिहास विषयाकरिता प्रवेशित गायकवाड बाळू भिमराव या विद्यार्थ्याने दि.३०/०४/२०२५ रोजीचे पत्र व ईमेलद्वारे सदर विद्यार्थ्यास UGC ची राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप मिळालेली नसल्यामुळे सदरची दंड/शुल्काची रु.७०००/- इतकी रक्कम भरणे शक्य नसल्याचे कळविलेले आहे, सदर दंड/शुल्क माफ करावे अशी विनंती केली आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, बाळू गायकवाड यांनी अंतीम शोध प्रबंध जमा केले असून सदर शोध प्रबंध संबंधी बहिस्थ परीक्षाकडून अंतीम अहवाल प्राप्त होवून अंतीम मौखिक परीक्षेपर्यंतची प्रक्रिया पूर्ण झाली आहे केवळ मौखिक परीक्षा होणार आहे.<br>याबाबतची सदर विनंती अर्ज टिपणीद्वारे सादर केले असता सदर टिपणीवर मा. प्र.कुलगुरु महोदयांनी सदर विद्यार्थ्याची परिस्थिती बरी नसल्यामुळे सदर विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून विद्यार्थ्यास न्याय देणे बाबत मान्यतेस्तव सादर केले असता मा. कुलगुरु महोदयांनी सदर विषय तात्काळ व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे.<br>सबब, पीएच.डी. इतिहास विषयाकरिता प्रवेशित गायकवाड बाळू भिमराव या विद्यार्थ्याची पीएच.डी. शुल्क/दंडाची रक्कम माफ करण्याची बाब विचारार्थ. | संशोधन विभाग |
| **ठराव:** | **श्री. गायकवाड बाळू भिमराव या विद्यार्थ्याचा अर्ज रितसर गाईडकडून आलेला नसल्यामुळे सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांच्या दि.११ मार्च, २०२५ व दि.१२ मार्च, २०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमधील ठराव क्र.२३ वर केलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी दि.११ मार्च,२०२५ व दि.१२ मार्च, २०२५ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीतील प्रस्तावावर ठराव क्र. २३ मध्ये विद्यापीठ स्थायी समितीला डावलून विविध अभ्यासमंडळावर करण्यात आलेल्या नियुक्त्या तात्काळ रद्द कराव्यात अशी शिफारस ही अधिसभ व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.<br>यावर अधिसभेकडून सदरचा प्रस्ताव डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली, असा ठराव पारित करुन अभ्यासमंडळे विभागास कळविण्यात आला होता.<br>अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२३/०१/२०२५ रोजीच्या टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशन केल्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४० (२) (ख) (तीन) नुसार मराठी अभ्यासमंडळावर संलग्न महाविद्यालयाचे अध्यापक (विभाग प्रमुख नसलेले) या संवर्गातून डॉ. आय. जे. तांबोळी यांचे नामनिर्देशन झाल्याचे विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/अमंवि/ २०२५/११२२, दि.०७/०२/२०२५ रोजी कळविण्यात आले होते.<br>तद्नंतर सदर पद हे स्थायी समितीकडून भरावयाचे असल्याने डॉ. आय. जे. तांबोळी यांचे सदस्यत्व विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२५/३९७२, दि.२६/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये रद्द झाल्याचे कळविण्यात आले आहे.<br>सबब, डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांच्या दि.११ मार्च, २०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमधील ठराव क्र.२३ वर केलेली कार्यवाही माहितीस्तव. | अभ्यासमंडळे विभाग |
| <u>ठराव:</u> | **डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांच्या दि.११ मार्च, २०२५ व दि.१२ मार्च, २०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमधील ठराव क्र.२३ वर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १४ ] | **हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सांमंजस्य (MoU Draft) करारास मान्यता मिळण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी स्टेडियम/ ग्राऊंड बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सांमंजस्य (MoU Draft) करारा स संदर्भात MoU Cell यांचे दि. २८/०३/२०२५ रोजी बैठक संपन्न झालेला असून ठराव सोबत जोडलेला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी हॉकी या खेळाचा प्रसार होवून विद्यापीठ व विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांना हॉकी विषयी आवड निर्माण होवून चांगले खेळाडू तयार व्हावेत तसेच हॉकी खेळाचे अद्यावत मैदान/स्टेडियम व सुविधा मिळण्याच्या हेतूने प्रस्तुत विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनी पैकी सर्वे क्र.३६५ व ३६६ पैकी १२ एकर जमिनीवर हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर यांच्या मार्फत हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यात येणार आहे. तसेच हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर यांच्या दि.२७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या जमिनीवर व त्यावरील बांधण्यात येणाऱ्या हॉकी मैदान व स्टेडियम इत्यादिवर हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर कधीही कोणत्याही प्रकारचे मालकी हक्क अथवा अधिकार सांगणार नाही सदरची मिळकत ही विद्यापीठाच्या मालकीची असून विद्यापीठाचीच राहणार आहे याबाबत संघटनेचे सचिव श्री.अजय श्रीशैल चाबुकस्वार यांच्या वतीने हमीपत्र लिहून दिले आहे.<br>सबब, हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सांमंजस्य (MoU Draft) करारास मान्यता मिळण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय सांमंजस्य कराराच्या मसूदासहित पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील ४८२ एकर परिसरात मोहगणी झाडाची रोप लावण्यास व त्याकरिता होणाऱ्या खर्चास मान्यतेची बाब विचारार्थ.** | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरामध्ये वृक्ष लागवड करावयाची आहे. त्याकरिता ऐनापूर नर्सिंग ॲन्ड अग्रीकल्चर फॉर्म, मैसूर, कर्नाटक येथे असलेल्या रोप वाटिकेमधून २५,००० मोहगणी रोपे एक रोपाची किंमत अंदाजे ४ रूपये प्रमाणे देणेबाबत संचालक, रासेयो यांना भ्रमणध्वनीवरून सहमती दर्शविली आहे. तरी प्रस्तुत विद्यापीठाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची आवश्यकता असून सदरची रोपे उपलब्ध करून घेण्याकरिता ऐनापूर नर्सिंग ॲन्ड अग्रीकल्चर फॉर्म, मैसूर, कर्नाटक येथील रोपवाटिकेमधून रोपे आणावे लागणार आहेत.

१. ऐनापूर नर्सिंग ॲन्ड अग्रीकल्चर फॉर्म, मैसूर, कर्नाटक येथी रोप वाटिकेमधून २५,००० मोहगणी रोपे आणण्यास व प्रती रोप ४/- रु. प्रमाणे एकूण २५,०००/- रोपांचे रक्कम रु.१,००,०००/- इतका खर्च होणार आहे.

२. सदरचे रोपे ही मैसूर, कर्नाटक येथून आणावी लागणार असल्याने आणि रोपांची संख्या जास्त असल्याने भाडे तत्वार गाडी करून सदरचे रोपे आणाावी लागणार असून त्याकरिता अंदाजे रू. ३५०००/- इतके गाडी भाडे अदा करणे आवश्यक आहे.

३. मान्यतेअंती रोपे खरेदी व गाडी भाडे करिता होणारा प्रत्यक्ष खर्च हा अभियांत्रिकी विभागाकडील Main. Of Garden and Purch. Of Gardening Material (उद्यान देखभाल व उद्यानविषयक साहित्य खरेदी) या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकाखाली खर्ची टाकावा लागणार आहे.

४. वरील सर्व बाबीकरिता खालील दर्शविल्याप्रमाणे अंदाजे खर्च होणार आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | अंदाजे रू. | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | मोहगणी रोप | २५००० | ४ | १००००० |
| २. | गाडी भांडे | १ | ३५००० | ३५००० |
| | एकूण अंदाजे खर्च | - | - | १३५०००/- |

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील ४८२ एकर परिसरात मोहगणी झाडाची रोप लावण्यास व त्याकरिता होणाऱ्या खर्चास मान्यतेची बाब विचारार्थ.

| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील ४८२ एकर परिसरात मोहगणी झाडाची रोप लावण्यास व त्याकरिता होणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |
|---|---|---|

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **आषाढी वारीमध्ये मोफत वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यास व होणा-या अनुषंगीक खर्चाच्या मान्यतेची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या समृध्द परंपरेचा मानबिंदू आहे. या वारीत येणा-या वारक-यांना मोफत आरोग्य सेवा पुरवण्याचे काम गेली १५ वर्षे प्रस्तुत विद्यापीठ करत आहेत. यासाठी लागणारी औषधे गोळा करण्यापासून ते सेवा शिबीर राबविण्याचे सर्व काम विद्यार्थी स्वत: करतात. गेल्यावर्षी या उपक्रमात ६०००० हून अधिक वारक-यांची सेवा करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली व समाजदर्शन घडले यावर्षी ज्ञानेश्वर माऊली व तुकाराम महारांच्या पालख्यांसोबत येणा-या दिंड्यांमधील वारक-यांना मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. सदरची सेवा देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील रासेयो स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. तरी सदरचा उपक्रम प्रस्तुत विद्यापीठ रासेयो विभागातर्फे करण्याचा मानस आहे. विद्यापीठांकडून वारीसाठी लागणारे औषधे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.<br>१. आषाढी वारीमध्ये सहभागी होणा-या भाविक भक्तांकरिता अकलूज, माळशिरस, वेळापूर आणि वाखरी या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ रासेयो विभागामार्फत मोफत औषधोपचार शिबीर घेण्याचा मानस आहे.<br>२. उक्त ठिकाणी आयोजित करण्यात येणा-या वैद्यकीय शिबीरामध्ये प्राथमिक उपचार सेवा पुरविण्याकरिता आवश्यक औषधे स्थानिक बाजारपेठेतील जेनेरिक स्टोअर मधून प्रत्यक्ष खरेदी करण्यासाठी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्च या विभागाकडील Ashadi Wari Nirmal Wari या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकावा लागणार आहे.<br>३. आषाढीवारीमध्ये मोफत वैद्यकीय औषधोपचार शिबीराकरिता आवश्यक औषधे खरेदी करण्यास अंदाजे रु. ५००००/- इतका खर्च होणार असून सदरची बाब विचारार्थ. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **आषाढी वारीमध्ये मोफत वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यास व होणा-या अनुषंगीक ₹५०,०००/- इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि. २६/०६/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. ३५(८) अन्वये, वारकरी संप्रदाय अभ्यासकेंद्र विद्यापीठात स्थापन करण्यस सर्वानुमते मान्यता देण्यात आली त्यास अनुसरुन दिनांक २५/७/२०२३ रोजी अस्थापना विभाग यांनी टिपणी सादर केली असता तत्कालीन मा. कुलगुरु महोदयांनी वारकरी संप्रदाय अभ्यासकेंद्र प्रस्ताव तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे तज्ज्ञ समिती गठित केली होती. | आस्थापना विभाग (शिक्षक) |

| अ.क्र. | अध्यक्ष/सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. पी. एन. कोळेकर | अध्यक्ष |
| २) | डॉ. शिवाजी वाघमोडे | सदस्य |
| ३) | डॉ. तानाजी देशमुख | सदस्य |

सदर समितीने वारकरी संप्रदाय अभ्यास केंद्रासंदर्भात सखोल अभ्यास करुन विद्यापीठाच्या वतीने पंढरपूर येथील वारी, वारकरी संप्रदाय, संत साहित्य, धार्मीक व सांस्कृतीक पंरपरा, वारी व्यवस्थापन, पर्यटन, अर्थकारण, पर्यावरण या अनुषंगाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अभ्यास केला जावा व परदेशातील विद्यार्थ्यांना व संशोधकांना या केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठात शिक्षण घेता यावे म्हणून वारकरी संप्रदाय अभ्यासकेंद्र याची व्याप्ती वाढवून वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र असा सविस्तर प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत समितीने श्री विठठल रुक्मिणी मंदीर समिती श्रीक्षेत्र, पंढरपूर यांच्याशी चर्चा केली असता मंदीर समितीने संयुक्तपणे सदरचे केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यास सहमती दर्शवली आहे व सर्व सहकार्य करण्याबाबत आश्वस्थ केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि श्री. विठठल रुक्मिणी मंदीर समिती श्रीक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तयार

केलेल्या वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र प्रस्तावाच्या मसूदास विद्या परिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार मा. कुलगरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केल्याची बाब विचारार्थ.

ठराव: वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

तसेच वारकरी संप्रदायाचा सखोल अभ्यास करण्यासाठी विद्यापीठाचे अभ्यासक्रम श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर समिती श्रीक्षेत्र, पंढरपूर येथे सुरु करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. प्रशांत मारुती पवार | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ३) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ५) | डॉ. अतुल तानाजी लकडे | सदस्य-सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १८ ] | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने गठित समितीचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९ मे, २०२३ रोजी झालेल्या बैठकीमधील विषय क्र.६ (४) वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या समितीची दि.२०/०५/२०२५ रोजी बैठक संपन्न झाली.<br>१. प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य — अध्यक्ष<br>२. डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ — सदस्य<br>३. श्री. राजीव उत्तम खपाले, लेखापाल, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. — सदस्य<br>४. डॉ. मलिक सगाजी रोकडे, उप कुलसचिव, आस्थापना विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. — सदस्य सचिव<br>उक्त गठित समितीने दि. २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत सर्वकष चर्चा केली व त्याअनुषंगाने अहवाल सादर केला आहे. समितीने पुढील प्रमाणे शिफारसी केल्या आहेत.<br>शिफारसी:<br>१. दि.२३/०४/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या मंजुर ठरावान्वये प्रति दिन देण्यात आलेली रु.१०० वाढ सध्या सुरु असून त्याप्रमाणे सर्व कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयाप्रमाणे मिळणाऱ्या वेतनामध्ये प्रति दिन रु.१०० अधिक वेतन देण्यात येत आहे. सन२०२५-२६ मधील सदर वेतनाच्या खर्चासाठी उपलब्ध अंदाजपत्रक तरतुद व सन २०२४-२५ मधील विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सध्या वेतनामध्ये वाढ करण्यात येवू नये.<br>२. असे निदर्शनास आले आहे की, काही कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदापेक्षा कमी वेतन अदा करण्यात येत आहे. त्यामुळे संवर्ग निहाय कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार त्यांच्या संवर्गा प्रमाणे किमान वेतन अदा करणेबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी.<br>३. वरील अ.क्र ०६ मध्ये नोंदविण्यात आलेल्या निरिक्षणाबाबत विचार करुन त्याबाबत त्वरित कार्यवाही करावी.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनाबाबत व्यवस्थापन परषिदेच्या ठरावाच्या अनुषंगाने गठित समितीचा अहवाल विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये खासगी कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनाबाबत गठित समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिपत्याखाली जमिनीचा तपशिल, ७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरीता विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त भूमी अभिलेख अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची व त्यांना द्यावयाचे मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिपत्याखाली जमिनीचा तपशिल, ७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरीता विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त भूमी अभिलेख अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून मानधनावर नियुक्ती करणे आवश्यक आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिपत्याखाली जमिनीचा तपशिल, ७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरीता विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त भूमी अभिलेख अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची व त्यांना द्यावयाचे मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिपत्याखालील जमिनीचा तपशिल, ७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरीता श्री. शिवलिंगप्पा बसवणप्पा मल्लाबादे, सेवानिवृत्त मुख्यालय सहाय्यक यांना नोडल अधिकारी म्हणून ०६ महिन्याकरिता विद्यापीठ फंडातून नियुक्त करण्यास व त्यांना प्रतिमाह ₹३०,०००/- इतके मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २० ] | श्री. मनोज उध्दव घोडके, राहणार हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांचा दि.१८/०६/२०२५ रोजीचा रोडसाठी जमिन चालू बाजारभावाने संपादनाबाबत दिलेला अर्ज विचारार्थ.<br>टिपणी: श्री. मनोज उध्दव घोडके, राहणार हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर जमिन मालक यांनी हिरज पाकणी रोड लगतची जमिन विद्यापीठाच्या रस्त्यासाठी किमान १५ ते २० फूट चालू भावाने विकण्यास तयारी दर्शविली आहे व तसा त्यांनी मा. कुलगुरु महोदय यांच्या नावे लेखी अर्ज सादर केला आहे. त्यांची जमिन विद्यापीठाने घेतल्यास किमान ३० ते ४० फूटाचा रोड विद्यापीठाच्या मुख्य इमारतीकडे जाण्यास उपलब्ध होईल अशी धारणा आहे. विद्यापीठास जमीन ही शासनामार्फत अधिग्रहीत/संपादीत करुन शासनाने विद्यापीठास हस्तांतरीत केल्यानंतरच सदरची जमीन ही विद्यापीठास वापर करता येईल.<br>सबब, श्री. मनोज उध्दव घोडके, राहणार हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांचा दि.१८/०६/२०२५ रोजीचा रोडसाठी जमिन चालू बाजारभावाने संपादनाबाबत दिलेला अर्ज विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | श्री. मनोज उध्दव घोडके, राहणार हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांचा दि.१८/०६/२०२५ रोजीचा रोडसाठी जमिन चालू बाजारभावाने संपादन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २१ ] | दि.२९ ऑगस्ट या राष्ट्रीय क्रीडादिनी खेळाडूं व संघ प्रशिक्षक व्यवस्थापक विद्यापीठातील संविधीक अधिकारी यांना देण्यात येणारे ब्लेझर तसेच युवा महोत्सव इत्यादी सारख्या कार्यक्रमावेळी देण्यात येणारे ब्लेझर खरेदीच्या दरकरार करण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने २९ ऑगस्ट या क्रीडा दिनी दरवर्षी विद्यापीठाकडून AIU आयोजित आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त तसेच साऊथ वेस्ट झोन व वेस्ट झोन स्पर्धेतून ऑल इंडिया स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू व संघ प्रशिक्षक व्यवस्थापकांना विद्यापीठातील संविधिक अधिकारी यांना दि.२९ ऑगस्ट या राष्ट्रीय क्रीडादिनी व राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये यश मिळविणाऱ्या खेळाडूंना रोख पारितोषक, ब्लेझर व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. तसेच विद्यार्थी विकास विभागा कडून आयोजित युवा महोत्सव इत्यादी सारख्या कार्यक्रमावेळी देण्यात येणारे ब्लेझर करिता प्रति वर्षी प्रत्येक विभागाकडून दरपत्रकाचे प्रस्ताव मागवून त्यामधील न्युनत्तम दर असलेल्या फर्म कडून ब्लेझर शिवून घेण्यात येतो. तरी या करिता प्रत्येक विभागा मार्फत ब्लेझरचे रंग, कापड ठरविणे तसेच ब्लेझरचे खरेदीचे संपूर्ण कार्यवाहीकरिता बराच वेळ खर्च होतो.<br>सबब, दि. २९ ऑगस्ट या राष्ट्रीय क्रीडादिन, युवा महोत्सव इत्यादी सारख्या कार्यक्रमावेळी देण्यात येणाऱ्या ब्लेझरेचे दरकराराने खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **दि.२९ ऑगस्ट या राष्ट्रीय क्रीडादिनी खेळाडूं व संघ प्रशिक्षक व्यवस्थापक विद्यापीठातील संविधीक अधिकारी यांना देण्यात येणारे ब्लेझर तसेच युवा महोत्सव इत्यादी सारख्या कार्यक्रमावेळी देण्यात येणारे ब्लेझर दरपत्रके मागवून खरेदी करण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ २२ ]</td><td>दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेतील आयत्या वेळचे विषय क्र.[१५(१५)] मधील ठरावाबाबतची बाब विचारार्थ.<br><br>(टिपणी: दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या मा.व्यवस्थापन परिषदेतील आयत्या वेळचे विषय क्र.[१५(१५)] मधील ठरावामधील क्र.३ " सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांना ब्लेझर देण्यात यावे " असा ठराव करण्यात आला आहे. सदरील ब्लेझरच कोणत्या प्रसंगी तसेच कोणत्या विभागामार्फत कार्यवाही करण्यातयावी या संबंधि स्पष्टता ठरावामध्ये दिसून येत नाही. मा. व्यवस्थापन परिषदेची निवड झालया नंतर सदर ब्लेझर खरेदीची कार्यवाही सभा व निवडणूक विभागाकडून करणे उचीत राहील.<br><br>सबब, दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेतील आयत्या वेळचे विषय क्र.[१५(१५)] मधील ठरावाबाबतची बाब विचारार्थ.</td><td>क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेतील आयत्या वेळचे विषय क्र.[१५(१५)] मधील ठरावाबाबत खालीलप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>१. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना पाच वर्षाच्या कालावधीकरिता एक ब्लेझर देण्यात यावे असे ठरले.<br><br>२. ब्लेझर बाबतची कार्यवाही सभा व निवडणूका विभागाकडून करण्यात यावी असे ठरले.<br><br>३. ब्लेझरचे कापड व कलर निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१)</td><td>डॉ. वसंत गुरुशांत कोरे</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>श्री. सुधाकर तुकाराम सरवदे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३)</td><td>प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४)</td><td>डॉ. श्रीमती आयशा मोहम्मद सादिक रंगरेज</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५)</td><td>डॉ. अतुल तानाजी लकडे, प्र-कुलसचिव</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २३ (१) ] | **आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या विविध डिमांड नोटीस व इतर कामाकरिता स्थानिक आयकर सल्लागार नियुक्त करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास आयकर विभागाकडून विविध आयकर ॲसेसमेंट व डिमांड नोटीस प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या नोटीसे संदर्भात तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामध्ये आयकर पोर्टलवरील नोटीसा डाऊनलोड करणे व त्याचा रेक्टीफिकेशन रिप्लाय तयार करणे, ॲसेसमेंट संदर्भात अपिल दाखल करावयचे असल्यास त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रांची नस्ती तयार करणे व अपिल फॉर्म भरणे इ. बाबी वेळेत पुर्ण करणे आवश्यक आहे. तसेच आयकरासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यावर सविस्तर मार्गदर्शन करणे इ. सर्व कामासाठी स्थानिक अनुभवी तज्ञ आयकर सल्लागार नेमणे आवश्यक आहे.<br>याबाबत, सीए इन्स्टिटयुट सोलापूर यांच्याकडून माहिती घेवून व स्थानिकरित्या सर्वेक्षण केले असता, श्री. गिरीश काशीनाथ चापळकर, सनदी लेखापाल यांना ३५ वर्षाचा या क्षेत्रातील अनुभव असुन त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी संमती देवून रु. ३५,०००/- + G.S.T प्रति वर्ष अशी फी आकारणी बाबत कळविले आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठास आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या नोटीसेस वेळेत रिप्लाय करणे, अपिल संदर्भातील सर्व कागदपत्रांची नस्ती तयार करणे व अपिल फॉर्म भरणे व आयकरासंदर्भात मार्गदर्शन करणे, आयकरासंदर्भातील इतर कामासाठी स्थानिक आयकर तज्ञ सल्लागार म्हणून श्री. गिरीश काशीनाथ चापळकर, सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या विविध डिमांड नोटीस व इतर कामाकरिता श्री. गिरीश काशीनाथ चापळकर, सनदी लेखापाल यांना आयकर तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास व त्यांना ₹३५,०००/- + G.S.T प्रति वर्ष फी आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २३ (२) ] | **आयकर निर्धारणाच्या कामाकरिता मुख्य आयकर आयुक्त कार्यालय, पुणे किंवा आयकर ट्रायब्यूनल, पुणे येथे अपिल दाखल करणे व केस लढणे इ. साठी आयकर तज्ञ सल्लागार नियुक्त करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास आयकर विभागाकडून विविध आयकर अॅसेसमेंट व डिमांड नोटीस प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये AY २०११-१२ ची केस आयकर ट्रायब्यूनल, पुणे येथे सुरु आहे. तसेच AY २०१७-१८ चे कर निर्धारण मुख्य आयकर आयुक्त पुणे येथे सुरु आहे. तसेच AY २०१४-१५, २०१५-१६ व २०२३-२४ या वर्षाच्या डिमांड नोटीसा प्राप्त झालेल्या आहेत.<br>उक्त आयकर निर्धारणाच्या कामाकरिता मुख्य आयकर आयुक्त कार्यालय, पुणे किंवा आयकर ट्रायब्यूनल, पुणे येथे अपिल वेळेत दाखल करणे व केस लढणे इ. साठी पुणे येथील तज्ञ व अनुभवी आयकर सल्लागार नियुक्त करणे आवश्यक आहे.<br>याबाबत, सीए इन्स्टिटयुट पुणे यांच्याकडून माहिती घेवून व पुणे येथे सर्वेक्षण केले असता, श्री. प्रमोद एस. शिंगटे, सनदी लेखापाल यांना ३० वर्षाचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असुन त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी संमती देवून रु. ७५,०००/- + G.S.T प्रति केस अशी फी आकारणी बाबत कळविले आहे. यावर वाटाघाटी केली असता त्यांनी रु.५०,०००/- + G.S.T प्रति केस अशी फी आकारणी बाबत संमती दिली आहे.<br>सबब, आयकर निर्धारणाच्या कामाकरिता मुख्य आयकर आयुक्त कार्यालय, पुणे किंवा आयकर ट्रायब्यूनल, पुणे येथे अपिल दाखल करणे व केस लढणे इ. कामासाठी श्री. प्रमोद एस. शिंगटे, सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **आयकर निर्धारणाच्या कामाकरिता मुख्य आयकर आयुक्त कार्यालय, पुणे किंवा आयकर ट्रायब्यूनल, पुणे येथे अपिल दाखल करणे व केस लढणे इ. साठी श्री. प्रमोद एस. शिंगटे, सनदी लेखापाल यांना आयकर तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास व त्यांना ₹५०,०००/- + G.S.T प्रति केस फी आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ २३ (३) ]</td><td>

**विद्यापरिषद बैठकीतील दि.२८ मे, २०२५ रोजीचे ठराव क्रमांक १३३ (५) बाब विचारार्थ.**

टिपणी: B. Com Part I, II & III IT (Information Technology) चे अभ्यासक्रम शुल्क (Fees Structure) हे B. Sc ( Entire Computer Science ) च्या सोबत जोडलेल्या चालू वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या शुल्काप्रमाणे लागू करण्यास विद्यापरिषदेच्या दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या ठराव क्रमांक १३३ ( ५ ) नुसार मान्यता देण्यात आली आहे. सोबत विद्यापरिष्द ठराव जाडले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे B. Com I, II & III (information Technology) या अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्क निश्चित करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे केली आहे. त्यानुसार खालील तक्त्याप्रकमाणे शुल्क तक्ता दिला आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अभ्यासक्रमाचे नाव व वर्ष</th><th>एकूण शुल्क रु.<br>(२०२५-२०२६ Fees Structure)</th></tr>
<tr><td>१</td><td>B. Com Part I (IT)</td><td>१७,५३६/-</td></tr>
<tr><td>२</td><td>B. Com Part II (IT)</td><td>१८,०९६/-</td></tr>
<tr><td>३</td><td>B. Com Part III (IT)</td><td>१९,४१९/-</td></tr>
</table>

वरील तक्त्यानुसार व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यामध्ये सुरु होणाऱ्या नविन अभ्यसक्रमा करीता सोबत B.Sc. (Entire Computer Science) या अभ्यासक्रमानुसार प्रवेश शुल्क लागु असल्याने त्याची माहिती तपशीलवार (Fee Structure) सोबत जोडली आहे. सदर शुल्क B. Com (IT) करीता लागू करण्याची बाब विचारार्थ.

</td><td>पी.जी. प्रवेश विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**विद्यापरिषदेने दि.२८ मे, २०२५ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्रमांक १३३ (५) अन्वये B. Com Part I, II & III IT (Information Technology) चे अभ्यासक्रम शुल्क (Fees Structure) बाबत केलेली शिफारस स्विकारुन खालीलप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अभ्यासक्रमाचे नाव व वर्ष</th><th>एकूण शुल्क रु.<br>(२०२५-२०२६ Fees Structure)</th></tr>
<tr><td>१</td><td>B. Com Part I (IT)</td><td>१७,५३६/-</td></tr>
<tr><td>२</td><td>B. Com Part II (IT)</td><td>१८,०९६/-</td></tr>
<tr><td>३</td><td>B. Com Part III (IT)</td><td>१९,४१९/-</td></tr>
</table>

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २३ (४) ] | श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळचा विषय सादर केला. स्वराज रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राची इमारत व आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र इमारत, जीवनचरित्र शिल्पकृती आराखडा तयार करणेसाठी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्र कुलसचिव डॉ अतुल लकडे यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आर्किटेक्चर श्री. आशितोष पाटील यांना विद्यापीठाचे आर्किटेक्चर पॅनेलवर घेऊन अध्यासनाला शासन व लोकप्रतिनिधी यांचेकडून निधी प्राप्त झाल्यानंतर आराखडा फी मानधन देण्याच्या अटीवर मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र |
| ठराव: | सदर विषयाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २३ (५) ] | दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील विषय क्र. १९ वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. व स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर व इतर हे न्यायहिताच्यादृष्टिने म्हणणे सादर करण्याकरिता दि.२४ जून, २०२५ च्या बैठकीमध्ये बोलविण्यात आल्याची बाब विचारार्थ. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव: | दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील विषय क्र. १९ वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने १) डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे, प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर २) श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे, सचिव, श्री. विठ्ठल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर व ३) डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर हे म्हणणे सादर करण्याकरिता उपस्थित होते.<br>उपरोक्तप्रमाणे दोन्हीं पक्षांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले व सभागृह जो काही निर्णय घेईल तो मान्य असल्याबाबत दोन्ही पक्षांना विचारणा केली असता, दोंन्ही पक्षांनी ते मान्य केले. त्यानुसार त्यावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.<br>१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था / महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.<br>२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Terminate न करता त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.<br>३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.<br>४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा.<br>त्यानंतर उपरोक्त निर्णय दोंन्ही पक्षांना मान्य असल्याबाबत सभागृहाने विचारणा केली असता, डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे यांनी मान्य असल्याचे सांगितले व डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य असल्याचे सांगितले.<br>डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य केल्याच्या अनुषंगाने त्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यानुसार खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.<br>"डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर व इतर यांच्याविरुध्द प्रस्तुत विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे दाखल केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीने दिलेले निकाल व परिनियम ३३५ नुसार केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अमान्य करण्यात आली व सभागृहाचा खालील निर्णय अर्जदार व पक्षकार यांना कळवावा असे सर्वानुमते ठरले."<br>१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था/ महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.<br>२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Terminate न करता त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.<br>३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.<br>४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद